Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education,
Pune.S.R.No.832-A, Final Pl No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं.८३२अे, फायनल प्लॉट नं.१७८,१७९बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयुच्या मागे,भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११ ००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./लेखा–६/११४
पुणे – ४११००४
दिनांक :–१०/०१/२०२२

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे,

**विषयः– मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या इ. १० वी व इ. १२ वीच्या परीक्षांसाठी आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काबाबत.**

**संदर्भः– श्री अतुल चोबे, साप्ताहिक, मराठवाडा रोजगार यांचे दिनांक ३०/१२/२०२१ रोजीचे पत्र.**

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणास सूचित करण्यात येते की, गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्रातील शिक्षण संस्था हया मंडळाने ठरवून दिलेल्या रकमेपेक्षा जास्त शुल्क आकारतात तसेच घेतलेल्या परीक्षा शुल्काची पावती देखील देत नाही. यासंबंधी प्रत्येक शैक्षणिक संस्थेला परीक्षा शुल्काची पावती देणे बंधनकारक करावे. जेणेकरुन पालकांना आर्थिक भार सहन करावा लागणार नाही. तसेच ठरवून दिलेल्या परीक्षा शुल्कासबंधीचे विवरण माहिती फलकावर लावले जावे हे देखील बंधनकारक करावे. अशी मागणी श्री अतुल चोबे, साप्ताहिक, मराठवाडा रोजगार यांनी उपरोक्त संदर्भिय पत्राव्दारे मंडळाकडे केली आहे.

या संदर्भात आपणास निर्देशित करण्यात येते की, महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम, १९७७ मधील नियम क्र. ४७ व ९४ मध्ये अनुक्रमे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काबाबत तरतूदी दिलेल्या आहेत. त्यातील परीक्षा शुल्काच्या दरामध्ये वेळोवेळी वाढ करण्यात आलेली आहे. तसेच नियम क्र. ४७ मध्ये "संबंधित माध्यमिक शाळेचा प्रमुख, विभागीय मंडळाच्या वतीने विभागीय मंडळाने विहित केलेल्या नमुन्यात भरलेल्या फीची पावती संबंधित उमेदवारास देईल" अशी आणि नियम क्र. ९४ मध्ये "संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रमुख, विभागीय मंडळाच्या वतीने, विभागीय मंडळाने विहित केलेल्या नमुन्यात भरलेल्या फीची पावती संबंधित उमेदवारास देईल" अशी स्पष्ट तरतूद करण्यात आलेली आहे.

Scanned with CamScanner

उपरोक्त नियमांमधील तरतूद व श्री अतुल चोबे यांचे निवेदन विचारात घेता आपणास निर्देशित करण्यात येते की, मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या इ. १० वी व इ. १२ वीच्या परीक्षेसाठी मंडळाकडे नोंदणी करण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेले विषय विचारात घेवून मंडळ मान्य दराने सदर विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कापोटीचे चलन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना संगणकीय प्रणालीव्दारे उपलब्ध करून दिले जाते आणि तेवढेच मंडळ मान्य दराचे विहित शुल्क शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून मंडळाकडे जमा केले जाते. याउपर श्री अतुल चोबे यांचे निवेदन विचारात घेता त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने आपल्या अधिनस्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर परीक्षा शुल्काबाबत उपरोक्त नियमातील तरतूदीनुसार शुल्क आकारणी व शुल्कापोटीची पावती देण्याबाबतची कार्यवाही होत असल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. मंडळाने विहित केलेल्या विहित शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारणी करणे, परीक्षा शुल्कापोटी आकारण्यात येणाऱ्या रकमेची पावती न देणे याबाबी निदर्शनास आल्यास महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम १९७७ मधील नियम क्र. २८ व ६६, ६७, ६८ आणि ६९ मधील तरतूदी विचारात घेवून अशा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्याबाबतीत कार्यवाही करावी. तसेच तक्रारीचे स्वरूप विचारात घेता मंडळाने परीक्षा शुल्कासाठी वेळोवेळी विहित केलेले दर विद्यार्थ्यांना विदित करून देणेबाबत/सूचना फलकावर लावणेबाबत आपल्या अधिनस्त सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना त्वरित सूचित करावे.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे.

---

क्र./नाविमं/उमा/अ–१/2656
नाशिक–४२२००३
दिनांक:– 13/01/२०२२

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मंडळ कार्यालयाच्या कार्यकक्षेतील
सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये,
नाशिक/धुळे/जळगांव/नंदूरबार

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, राज्य मंडळाचे वरील पत्रानुसार नोंद घेवून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. सदरचीबाब सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२ ००३.

Scanned with CamScanner